प्रकरण पाचवे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे

# संशोधन सामुग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.१ प्रस्तावना

५.२ माध्यमिक शिक्षकांच्या मूल्यांचे विश्लेषण

१. सैध्दांतिक मूल्य

२. आर्थिक मूल्य

३. सौंदर्यविषयक मूल्य

४. सामाजिक मूल्य

५. राजनैतिक मूल्य

६. धार्मिक मूल्य

७. माध्यमिक शिक्षकांच्या मूल्यांचे सरासरी वर्गीकरण

८. पुरुष शिक्षकांच्या मूल्यांचे वर्गीकरण

९. स्त्री शिक्षकांच्या मूल्यांचे वर्गीकरण

५.३ माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचे विश्लेषण

५.४ १. शालेय व सर्वसामान्य वातावरण समयोजन क्षमता.

२. सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमता.

३. व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता.

४. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता.

५. आर्थिक व व्यावसायिक सामाधान समायोजन क्षमता.

६. माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचे सरासरी वर्गीकरण.

७. पुरुष शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचे वर्गीकरण.

८. स्त्री शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचे वर्गीकरण.

५.५ समारोप

प्रकरण पाचवे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

कोणत्याही चांगल्या समस्येची निवड व उकल करण्यासाठी संशोधनाचे मूख्यत्वे तीन भागात विभाजन केले जाते.

१. प्रस्तावना

२. अहवालाचा प्रमुख भाग

३. निष्कर्ष

## १. प्रस्तावना

अहवालाच्या प्रमुख भागात माहितीचे संकलन, वर्गीकरण, मांडणी, विश्लेषण व समस्येचे अर्थनिर्वचन इत्यादि भाग अपेक्षीत असतो. सर्वेक्षण करुन समस्येतील बारकावे शोधावे लागतात. हेतू एवढाच असतो की समस्येची उकल समाजाकडून योग्य तऱ्हेने व्हावी.

जमा केलेल्या माहितीची नोंद संशोधकाने संपूर्णपणे वस्तुनिष्ठ पध्दतीने केली पाहिजे. यातील काही माहिती निरुपयोगी वाटत असली तरी ती द्यावी लागते. कारण विशदीकरणाच्या वेळी संशोधकास आपल्या दृष्टीकोनातून त्या माहितीचे मूल्यमापन करुन निष्कर्ष काढता येतात. यान्वये संशोधकाने माहितीसाठी प्रश्नावल्या भरुन घेतल्या व त्यातून समस्येचे बारकावे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ही जमा केलेली माहिती परिच्छेदात योग्य त्या कोष्टकांच्या आकृत्यांच्या सहायाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोष्टके, टेबल्स् यांना यथोचित शीर्षक दिली आहेत. जमा केलेली सर्व माहिती प्रायोगिक तत्वावर व वैज्ञानिक दृष्टीने छाननी करता यावी. यादृष्टीने कोष्टकातून मांडण्याचा संशोधिकेने मार्गदर्शकांच्या सहायाने आटोकाट प्रयत्न केला आहे. तसेच विशदीकरणाच्या वेळी मी बुध्दी, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती अशा अनेक गोष्टीचा वापर करुन जमा केलेल्या माहितीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. निष्कर्षासाठी या संख्यात्मक माहितीचा बराच उपयोग झालेला आहे. सत्याचा शोध करणे हे विज्ञानाचे सर्वोच्च ध्येय आहे. म्हणून निरीक्षण आणि अनुभवातून मिळविलेले परिवर्तन संबंध, कारण इत्यादि बाबत घटनेचे ज्ञान विश्वासार्ह व स्थायी स्वरुपाचे अन्वेषणाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. अन्वेषण कार्य हे या घटनांच्या माहितीमुळेच

पुढे जात असते. त्यावरुन अनुमाने काढता येतात. योग्य निष्कर्ष मांडता येतात.

संशोधनात्मक अभ्यासात शास्त्रीय विश्लेषणाला विशेष महत्व असल्याने सांख्यकिया वाढत्या ज्ञानाचा त्यात उपयोग केला आहे. त्यामुळे मोजक्या पण स्पष्ट शब्दात वस्तुस्थितीचे वर्णन करता येते. विचारात परिपक्वता येते. वर्णनात्मक सांख्याकी व अनुमानात्मक सांख्यिकी या दोन्हींचा उपयोग येथे संशोधिकेने केलेला आहे. संकलीत माहितीचे निर्वचन तर्कसंगत असून त्यात सूक्ष्म गोष्टीचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे.

**कोष्टक क्र. २**

## माध्यमिक शिक्षकांना दिलेली प्रश्नावलीला प्रतिसाद दर्शविणारे कोष्टक

| प्रश्नावल्या दिल्या ते घटक | प्रश्नावल्या दिल्या | प्रश्नावल्या आल्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| माध्यमिक शिक्षक | १२० | ८० | ६६.६६ % |

निवडलेल्या १२ शाळेतील ९ वी १० वी ला अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना म्हणजेच १२० शिक्षकांना प्रश्नावल्या दिल्या. त्यापैकी ८० शिक्षकांनी प्रश्नवाल्या भरुन दिल्या. म्हणजेच ६६.६६% प्रतिसाद मिळाला. प्रश्नावल्या भरुन देण्यास शिक्षकांना फारच आढेवेढे घेतले.

**कोष्टक क्र. ३**

## विद्याशाखा व शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युत्तर शिक्षक व त्यांचे शेकडा प्रमाण

| अ. क्र. | विद्याशाखा व शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युत्तर | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी, बी.एड. | ४२ | ५२.५% |
| २ | बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी, बी.पी.एड. | ९ | ११.२५% |
| ३ | बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी, डी.आर.एस्. | — | — |
| ४ | एम्. ए., बी.एड. | १५ | १८.७५% |
| ५ | एम्.ए., डी.आर.एस्. | ६ | ७.५% |
| ६ | एम्.ए.,एम्.एड. | ४ | ५% |
| ७ | बी.ए./बी.एस्सी, एम्.एड. | ४ | ५% |
| | **एकूण** | ८० | १००% |

वरील सारणीवरुन शिक्षकांचे विद्याशाखा व शिक्षण शास्त्र पदवी व पदव्युत्तर यातील टक्केवारीचे प्रमाण पाहता बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी, बी.एड. ५२.५% इतके आहे. बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी, बी.पी.एड. ११.२५% इतके आहे. एम्.ए., बी.एड. १८.७५% इतके आहे. एम्.ए., डी.आर.एस्. ७.५% इतके आहे. एम्.ए.,एम्.एड. ५% इतके आहे. बी.ए., बी.एस्सी, एम्.एड. ५% इतके आहे.

यावरुन असे म्हणता येईल की शिक्षकांचे जास्तीत जास्त प्रमाण विद्याशाखा शिक्षणशास्त्र पदवी म्हणजेच बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी ५२.५% इतके आहे. तर कमी प्रमाण विद्याशाखा / शिक्षणशास्त्र पदव्युत्तर म्हणजे एम्.ए. एम्.एड्. ५% इतके आहे.

## माध्यमिक शिक्षकांच्या मूल्यांचे विश्लेषण

माध्यमिक शिक्षकांनी भरून दिलेल्या मुल्यअध्ययन चाचणीवरून मुल्यांचे विश्लेषण केले आहे.

### कोष्टक क्र. ४

### शिक्षकांची मूल्ये वर्गीकरण गुण विश्लेषण कोष्टक

| सैध्दांतिक | | आर्थिक | | सौंदर्यविषयक | | सामाजिक | | राजकीय | | धार्मिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रॉ. स्कोर | गुण | रॉ. स्कोर | गुण | रॉ. स्कोर | गुण | रॉ. स्कोर | गुण | रॉ. स्कोर | गुण | रॉ. स्कोर | गुण |
| १७ च्या खाली | ० | १३ च्या खाली | ० | १५ च्या खाली | ० | ९ च्या खाली | ० | १४ च्या खाली | ० | १० च्या खाली | ० |
| १८ - २३ | १ | १४ - २३ | १ | १६ - २१ | १ | १० - १३ | १ | १५ - २४ | १ | ११ - १४ | १ |
| २४ - २७ | २ | २४ - २७ | २ | २२ - २५ | २ | १४ - २१ | २ | २५ - २८ | २ | १५ - १८ | २ |
| २८ - ३१ | ३ | २८ - ३१ | ३ | २६ - २९ | ३ | २२ - २५ | ३ | २९ - ३२ | ३ | १९ - ३० | ३ |
| ३२ - ३७ | ४ | ३२ - ३५ | ४ | ३० - ३५ | ४ | २६ - ३३ | ४ | ३३ - ३६ | ४ | ३१ - ३४ | ४ |
| ३८ - ४१ | ५ | ३६- ३९ | ५ | ३६ - ४१ | ५ | ३४ - ३६ | ५ | ३७ - ४० | ५ | ३५ - ४२ | ५ |
| ४२ - ४५ | ६ | ४० - ४७ | ६ | ४२ - ४५ | ६ | ३७ - ४५ | ६ | ४१ - ४४ | ६ | ४३ - ४६ | ६ |
| ४६ - ४९ | ७ | ४८ - ५१ | ७ | ४६ - ५३ | ७ | ४६ - ४९ | ७ | ४५ - ४८ | ७ | ४७ - ५४ | ७ |
| ५० - ५५ | ८ | ५२ - ५५ | ८ | ५४ - ५७ | ८ | ५० - ५७ | ८ | ४९ - ५२ | ८ | ५५ - ६६ | ८ |
| ५६ - ५७ | ९ | ५६ - ६३ | ९ | ५८ - ६१ | ९ | ५८ - ६५ | ९ | ५३ - ६२ | ९ | ६७ - ७४ | ९ |
| ५८ च्यावर | १० | ६४ च्यावर | १० | ६२ च्यावर | १० | ६६ च्यावर | १० | ६३ च्यावर | १० | ७५ च्यावर | १० |

## माध्यमिक शिक्षकांच्या सैध्दांतिक मूल्याचे वर्गीकरण

मूल्य अध्ययन चाचणीमध्ये सैध्दांतिक मूल्यासाठी २० प्रश्न निश्चित केले होते त्या प्रश्नांना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

५६, ५१, ५९, ५८, ६४, ५८, ४५, ५४, ५९,
६३, ५२, ५०, ४६, ४८, ५९, ५९, ४८, ५३,
५५, ६४, ५८, ६०, ५८, ४६, ४६, ५४, ५७,
५५, ५४, ४५, ४५, ४८, ५८, ५३, ४९, ५०,
५१, ५०, ४६, ५०, ३५, ६१, २७, ५७, ३०,
४८, ५४, ५९, ५६, ५९, ४८, ४५, ६२, ५६,
५२, ५९, ५९, ५१, ५८, ४६, ५६, ५९, ६४,
४८, ५८, ५५, २७, ४९, ५९, ४६, ५०, ६१,
५७, ४८, ४६, ५४, ५७, ५६, ५४, ५५,

वरील ८० गुणसंख्याच्या आधारे गुणसंख्यांच्या आधारे गुणवर्गाचा आकार धरून खालील पत्राकात नोंदी, वारंवारिता, नॉर्मल गुण व त्यांचे श्रेणीकरण दाखवलेले आहे.

# शिक्षकांच्या सैध्दांतिक मूल्याचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण

## कोष्टक क्र. ५

## सैध्दांतिक मूल्यांचे वारंवारिता पत्रक

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| ११ च्या खाली | | ----- | ----- | ० | |
| १८-२३ | | ----- | ----- | १ | अतिशय निकृष्ट |
| २४-२७ | \|\| | २ | २.५ % | २ | निकृष्ट |
| २८-३१ | \| | १ | १.२५ % | ३ | फारच कमी |
| ३२-३७ | \| | १ | १.२५ % | ४ | कमी |
| ३८-४१ | | ----- | ----- | ५ | सरासरी |
| ४२-४५ |卌 | ५ | ६.२५ % | ६ | बरा |
| ४६-४९ | 卌 卌 卌 | १५ | १८.२५ % | ७ | चांगला |
| ५०-५५ | 卌 卌 卌 卌 \|\| | २२ | २७.५ % | ८ | फार चांगला |
| ५६-५७ | 卌 卌 \|\|\|\| | १४ | १७.५ % | ९ | उत्कृष्ट |
| ५८ च्या वर | 卌 卌 卌 卌 | २० | २५ % | १० | अतिशय चांगला |
| | **एकूण** | **८०** | **१०० %** | | |

वरील कोष्टक क्र. ५ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सैध्दांतिक मूल्यांना मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरुन असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी २८-३१ व ३२-३७ या गुणवर्गामध्ये प्रत्येकी एका शिक्षकाचा समावेश होतो. २४-२७ या गुणवर्गामध्ये दोन शिक्षकांचा समावेश होतो. ४२ -४५ या गुणवर्गात ५ शिक्षकांचा समावेश होतो. ४६ ते ४९ या गुणवर्गामध्ये १५ शिक्षकांचा समावेश होतो. ५०-५५ या गुणवर्गामध्ये २२ शिक्षकांच्या समावेश होतो. ५६-५७ या गुणावर्गामध्ये १४

शिक्षकांचा समावेश होतो. तर ५८ व ५८ च्या वरील गुणवर्गात २० शिक्षकांचा समावेश होतो. शेकडेवारी वरुन गुण वर्गात २० शिक्षकांच्या समावेश होतो. शेकडेवारी वरुन विचार केला असता. सर्वात जास्त म्हणजेच २७.५ % शिक्षक ५०-५५ या गुणवर्गात येतात तर सर्वात कमी म्हणजेच १.२५ % शिक्षक २८.३१/३२-३७ या गुणवर्गात येतात. कोष्टकावरून पाहिजे असता २७.५ % शिक्षकांचे सैध्दांतिक मूल्य सर्वात जास्त आहे आणि ते फार चांगला या श्रेणीमध्ये येते. तर १.२५% शिक्षकांचे मूल्य सर्वात कमी असून ते खूपच कमी श्रेणी देते. म्हणजे माध्यमिक शिक्षकाकडे सैध्दांतिक मूल्य अधिक आहे.

माध्य सर्व गुणांच्या बेरजेचा $\Sigma x$

एकूण संख्येने (N) भाग देणे $M = \Sigma x / N$

एकूण गुण ४२०८

एकूण शिक्षक संस्था ८०

सरासरी गुण = ४२०८/८० = ५२.६१

सरासरी गुण ५२.६१

सरासरी गुणांचा विचार केला असता माध्यमिक शिक्षकांचे सैध्दांतिक मूल्य चांगले आहे.

### माध्यमिक शिक्षकांच्या आर्थिक मूल्यांचे वर्गीकरण.

मूल्य चाचणीमध्ये आर्थिक मूल्यासाठी २० प्रश्न निश्चित केले होते. त्या प्रश्नांना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८, | ३८, | ३९, | ३८, | ४५, | ३७, | ३७, | ३९, | ३४ |
| ३१, | ३९, | ४१, | ४१, | ३९, | ३४, | ३४, | ३९, | ४३ |
| ३२, | ४५, | ३८, | ३८, | ३८, | ३८, | ३८, | ३९, | ३३ |
| ३२, | ३९, | ३७, | ४१, | ३९, | ४२, | ४३, | ३९, | ४४ |
| ४७, | ४१, | ४२, | ४२, | २३, | ३२, | २८, | ३२, | २९ |
| ३५, | ३९, | ३४, | ३४, | ३४, | ३४, | ४१, | ४४, | ३८ |
| ३९, | ३४, | ३९, | ३८, | ३८, | ४२, | ३४, | ३४, | ४५ |
| ३४, | ३२, | २८, | ३९, | ३४, | ३८, | ४२, | ३२, | ३२ |
| ३५, | ३८, | ३९, | ३३, | ४२, | ३९, | ३२, | ३४, | |

वरील ८० गुणसंख्याच्या आधारे गुणावर्गाचा आकार धरुन खालील पत्रकात नोंदी वारंवारिता नॉर्मल गुण व त्यांचे श्रेणीकरण दाखविलेले आहे.

## शिक्षकांच्या आर्थिक मूल्याचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण

### कोष्टक क्र. ६

### आर्थिक मूल्यांचे वारंवारिता पत्रक

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १३ च्या खाली | | ----- | ----- | ० | |
| १४-२३ | \| | १ | १.२५% | १ | अतिशय निकृष्ट |
| २४-२७ | | ----- | ----- | 2 | निकृष्ट |
| २८-३१ | \|\|\|\| | ४ | ५ % | 3 | फारच कमी |
| ३२ - ३५ | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ | २५ | ३१.२५ % | ४ | कमी |
| ३६ - ३९ | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~\| | ३१ | ३८.७५ % | ५ | सरासरी |
| ४० - ४७ | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ \|\|\|\| | १९ | २३.७५ % | ६ | बरा |
| ४८ - ५१ | | ----- | ----- | ७ | चांगला |
| ५२ - ५५ | | ----- | ----- | ८ | फार चांगला |
| ५६-६३ | | ----- | ----- | ९ | उत्कृष्ट |
| ६४ च्या वर | | ----- | ----- | १० | अतिशय चांगला |
| | **एकूण** | ८० | **१०० %** | | |

वरील कोष्टक क्र. ६ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सैध्दांतिक मूल्यांना मिळालेल्या गुणांच्या वारंवारीता पत्रकावरुन असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी १४-२३ या गुणवर्गामध्ये एका शिक्षकाचा समावेश आहे. २८-३१ या गुणवर्गामध्ये ४ शिक्षकांचा समावेश आहे. ३२ - ३५ या गुणवर्गात २५ शिक्षकांचा समावेश आहे. तर ४० ते ४७ या गुणवर्गामध्ये १९ शिक्षकांचा समावेश आहे.

शेकडेवारी वरून विचार केला असता सर्वात जास्त म्हणजेच ३६ - ३९ या गुणवर्गामध्ये ३८.७५% शिक्षकांचा समावेश तर सर्वात कमी म्हणाजेच १४ - २३ या गुणावर्गामध्ये १.२५% शिक्षकांचा समावेश होतो. कोष्टकावरून पाहिले असता शेकडा ३८.७५ शिक्षकाकडे आर्थिक मूल्य सरासरी या श्रेणीचे आहे तर १.२५% शिक्षकाकडे हे मूल्य कमी म्हणजेच अतिशय निकृष्ट श्रेणीचे आहे. म्हणजेच आर्थिक मूल्याच्या बाबतीत माध्यमिक शिक्षक सरासरी श्रेणीमध्ये येतात.

शिक्षकाचे सरासरी आर्थिक मूल्य

सरासरी गूण $M = \Sigma x / N$

२९७० / ८० = ३७.१३

सरासरी आर्थिक मूल्य = ३७.१३

अर्थिक मूल्याच्या बाबतीत माध्यमिक शिक्षक सरासरी श्रेणीमध्ये येतात.

### माध्यमिक शिक्षकांच्या सौदर्यविषयक मूल्याचे वर्गीकरण

मूल्यचाचणीमध्ये सौदर्यविषयक मूल्याचे २० प्रश्न निश्चीत केले होते. त्या प्रश्नांना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४२, | ४६, | ४१, | ३९, | ४०, | ४५, | ३३, | ४६, | ५६, | ३०, | ३५, | ४९, |
| ३५, | ३५, | ५२, | ५२, | ३५, | ४२, | ३७, | ४०, | ३९, | ४२, | ३९, | ४०, |
| ४०, | ४१, | ४२, | ३७, | ४०, | ३३, | ३५, | ३५, | ४८, | ४२, | ४५, | ३९, |
| ४६, | ४९, | ५०, | ५६, | ३१, | ४७, | ३३, | ५१, | ३२, | ३६, | ४०, | ५६, |
| ५२, | ५२, | ४२, | ३५, | ४०, | ४२, | ३५, | ५२, | ४१, | ४६, | ३९, | ५८, |
| ५२, | ५२, | ४०, | ४२, | ४५, | ३७, | ३३, | ४५, | ५६, | ४०, | ५६, | ४७, |
| ५१, | ३६, | ४०, | ४१, | ४२, | ४८, | ४०, | ३७ | | | | |

वरील ८० गणासांरच्या आधारे गुणवर्गाचा आकार धरून खालील पत्रकात नोंदी वारंवारिता नॉर्मल गुण व त्याचे श्रेणीकरण दाखवले आहे.

## शिक्षकांच्या सौदर्यविषयक मूल्याचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण

### कोष्टक क्र. ७

### सौदर्यविषयक मूल्यांचे वारंवारिता पत्रक

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १५ च्या खाली | | ----- | ----- | 0 | |
| १६-२१ | | ----- | ----- | १ | अतिशय निकृष्ट |
| २२-२५ | | ----- | ----- | 2 | निकृष्ट |
| २६-२९ | | ----- | ----- | 3 | फारच कमी |
| ३० - ३५ | 𝍸 𝍸 𝍸 | १५ | १८.७५% | ४ | कमी |
| ३६ - ४२ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३५ | ४३.७५% | ५ | सरासरी |
| ४३ - ४५ | \|\|\|\| | ४ | ५% | ६ | बरा |
| ४६ - ५३ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \|\| | २१ | २६.२५% | ७ | चांगला |
| ५४ - ५७ | 𝍸 | ५ | ६.२५% | ८ | फार चांगला |
| ५८-६१ | | ----- | ----- | ९ | उत्कृष्ट |
| ६२ च्या वर | | ----- | ----- | १० | अतिशय चांगला |
| | N = | ८० | १०० % | | |

वरील कोष्टक क्र. ७ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सौदर्यविषयक मूल्यांना मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरुन असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी ३० - ३५ या गुणवर्गामध्ये १५ शिक्षकाचा समावेश होतो. ३६ - ४२ या गुणवर्गामध्ये ३५ शिक्षकांचा समावेश आहे. ४३ - ४५ या गुणवर्गात २१ शिक्षकांचा समावेश होतो. तर ४६ ते ५३ या गुणवर्गामध्ये २१ शिक्षकांचा समावेश होतो. तर ४६ - ५७ या वर्गात ५ शिक्षकांचा समावेश होतो. शेकडेवारून विचार केला असता सर्वात जास्त

म्हणजेच ४३.७५ % शिक्षकांच्या समावेश ४६-४२ या गूणवर्गात होतो. तर सर्वात कमी म्हणजे ५% शिक्षकांचा समावेश ४३-४५ या गुणवर्गात होतो. सारणी वरून पाहीले असता सौदर्यविषयक मूल्याच्या बाबतीत पाहीले असता माध्यमिक शिक्षक सरासरी या श्रेणीत येतात.

शिक्षणाचे सरासरी सौंदर्यविषय मूल्य

$$M = \Sigma x / N$$

$$= ३३५२ / ८०$$

$$= ४१.९१$$

४१.९१ म्हणजेच ४२ सरासरी गुण ३६.४२ या गुण वर्गात येतात. म्हणजेच माध्यमिक शिक्षकांचे सौंदर्यविषय मूल्य सरासरी आहे.

## सामाजिक मूल्य

### माध्यमिक शिक्षकांच्या सामाजिक मूल्यांचे वर्गीकरण

मूल्यचाचणी मध्ये सामाजिक मूल्यालाही २० प्रश्न निश्चित केलेले होते. या प्रश्नांना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९, | ३३, | ३७, | ३४, | २९, | ३७, | ४६, | ३६, | २६, | ४२ |
| २८, | २६, | ३१, | ३७, | २५, | २६, | ३७, | २८, | ३९, | २९ |
| ३४, | ३९, | ३४, | ३९, | ३९, | ३८, | ४१, | ३९, | ३०, | ४६ |
| ३१, | ३७, | ३५, | २८, | ३६, | २७, | २९, | २६, | २८, | २७ |
| १४, | ३१, | १८, | २८, | १९, | ३८, | ३०, | २६, | २६, | २५ |
| ३३, | ३१, | ३४, | ३९, | २८, | २५, | ३७, | ३३, | ३४, | २८ |
| २६, | २५, | २९, | ३३, | ३७, | ३९, | १८, | ३६, | २६, | ३९ |
| २७, | ३१, | २८, | ३८, | ३९, | ३८, | ४१, | ३५, | ३०, | ३९ |

वरील ८० गुणसंख्याच्या आधारे गुणवर्गाचा आकार धरुन खालील पत्रकात नोंदी, वारंवारिता व नॉर्मल गुण व विशलेषण दाखविले आहे.

**शिक्षकांच्या सामाजिक मूल्यांचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण**

**कोष्टक क्र. ८**

**सामाजिक मूल्याचे वारंवारिता पत्रक**

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| ९ च्या खाली | | ----- | ----- | 0 | |
| १० -१३ | | ----- | ----- | १ | अतिशय निकृष्ट |
| १४ - २१ | IIII | ४ | ५ % | २ | निकृष्ट |
| २२ - २५ | IIII | ४ | ५ % | 3 | फारच कमी |
| २६ - ३३ | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 | ३५ | ४३.७५% | ४ | कमी |
| ३४ - ३७ | 卌 卌 卌 II | १७ | २१.२५% | ५ | सरासरी |
| ३८ - ४५ | 卌 卌 卌 III | १८ | २२.५% | ६ | बरा |
| ४६ - ४९ | | २ | २.५% | ७ | चांगला |
| ५० - ५७ | | ----- | ----- | ८ | फार चांगला |
| ५८-६५ | | ----- | ----- | ९ | उत्कृष्ट |
| ६६ च्या वर | | ----- | ----- | १० | अतिशय चांगला |
| | **एकूण** | ८० | १०० % | | |

वरील कोष्टक क्र. ८ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सामाजिक मूल्यांना मिळालेल्या

गुणांच्या वारंवारिता पत्रकावरुन असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी १४ - २१ व २२ - २५ गुणवर्गात प्रत्येकी ४,४ शिक्षकांचा समावेश होतो. २६ - ३३ या गुणवर्गात ३५ शिक्षकांचा समावेश होतो. ३४ - ३७ गुणवर्गामध्ये १७ शिक्षकांचा समावेश होतो. ३८ - ४५ गूणवर्गात १८ शिक्षकांचा समावेश होतो. ४६ - ४९ या गूणवर्गात २ शिक्षकांचा समावेश होतो. शेकडेवारीवरून विचार केला असता सर्वात जास्त म्हणजेच ४३.७५% शिक्षकांचा २६ - ३३ या गुणवर्गात समावेश होतो तर सर्वात कमी २.५ % शिक्षकांचा ४६ - ४९ या गुणवर्गात समावेश होतो. कोष्टकावरून पाहिले असता ८० शिक्षकापैकी ५% शिक्षकांचे सामाजिक मूल्य निकृष्ट आहेत तर ५% शिक्षकांचे सामाजिक मूल्य फार कमी आहे. ४३.७५ शिक्षकांचे सामाजिक मूल्य कमी आहे तर २१.२५ % शिक्षकांची सामाजिक मूल्य सरासरी आहे. तर २२.५% शिक्षकांचे सामाजिक मूल्य बरे आहे.२.५ % शिक्षकांचे सामाजिक मूल्य चांगले आहे सर्वसाधारणपणे सामाजिक मूल्याच्या बाबतीत माध्यमिक शिक्षक कमी श्रेणी मध्ये येतात.

शिक्षकांचे सरासरी सामाजिक मूल्य

$M = \Sigma x / N$

= २७४६/ ८०

= ३४.३३

३४.३३ म्हणजेच ३४ सरासरी गूण ३४ - ३७ या गूणवर्गात येतात म्हणजेच माध्यमिक शिक्षकांचे सामाजिक मूल्य सरासरी मूल्य सरासरी आहे.

## राजकिय मूल्य

### माध्यमिक शिक्षकांच्या राजकिय मूल्याचे वर्गीकरण.

मूल्य चाचणीमध्ये राजकिय मूल्यासांठी २० प्रश्न निश्चित केलेले होते. या प्रश्नाना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२, | ३४, | ३३, | ३६, | २९, | ३७, | ३३, | ३३, | ३५, | ३५, | ३४, | २२, |
| ३७, | ३५, | २८, | ३४, | ३५, | ३०, | ४१, | २९, | ३६, | ३२, | ३६, | ३२, |

३२, ३९, ३२, ४१, ३३, ३३, ५७, ३५, ३५, ३०, ३२, २२,

२४, २२, २६, ३१, २३, ३५, २०, ४२, ३४, ४०, ३३, ३५,

३४, २८, २९, ३७, २३, ३२, ३४, २८, ३३, ३४, ३६, २६,

३४, २८, २९, २९, ३७, ४१, २०, ३२, ३५, ३२, २१, ३५,

४२, ४०, ३२, ३१, ३२, ३५, ३३, ४१

वरील ८० गुणांचा आधारे गुणवर्गाचा आकार धरून खालील पत्रकात नोंदी व वारंवारिता दाखवल्या आहेत.

**शिक्षकांच्या राजकिय मूल्यांचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण**

**कोष्टक क्र. ९**

**राजकिय मूल्याचे वारंवारिता पत्रक**

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १४ च्या खाली | | ----- | ----- | 0 | 0 |
| १५ -२४ | 卌 卌 | १० | १२.०५% | १ | अतिशय निकृष्ट |
| २५ - २८ | 卌 \| | ६ | ७.०५% | 2 | निकृष्ट |
| २९ - ३२ | 卌 卌 卌 \|\|\|\| | १९ | २३.७५% | ३ | फारच कमी |
| ३३ - ३६ | 卌 卌 卌 卌 卌 卌 \| | ३१ | ३८.७५% | ४ | कमी |
| ३७ - ४० | 卌 \|\| | ७ | ८.७५% | ५ | सरासरी |
| ४१ - ४४ | 卌 \| | ६ | ७.५०% | ६ | बरा |
| ४५ - ४८ | | ----- | ----- | ७ | चांगला |
| ४९ - ५२ | | ----- | ----- | ८ | फार चांगला |
| ५३ - ६२ | \| | १ | १.२५% | ९ | उत्कृष्ट |
| ६३ च्या वर | | ----- | ----- | १० | अतिशय चांगला |
| | **एकूण** | ८० | **१०० %** | | |

वरील कोष्टक क्र ९ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या राजकिय मूल्यांला मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्राकांवरून असे अनुमान काढता येते कि ८० शिक्षकांच्यापैकी १२.५% शिक्षकांचे राजकिय मूल्य अतीशय निकृष्ट दर्जाचे आहे. ७.५% शिक्षकांचे राजकिय मूल्य निकृष्ट दर्जाचे आहे. २३.७५% शिक्षकांचे राजकिय मूल्य फार कमी आहे. ३८.७५% शिक्षकांचे राजकिय मूल्य कमी आहे. ८.७५% शिक्षकांचे राजकिय मूल्य सरासरी आहे. ७.०५% शिक्षकांचे राजकिय मूल्य बरे आहे तर १.२५% शिक्षकांचे राजकिय मूल्य उत्कृष्ट आहे.म्हणजेच सर्वात जास्त शिक्षकांचा समावेश ३३-३६ या गुणवर्गात होते.तर सर्वात कमी शिक्षकांचा समावेश ५३ - ६२ या गुणवर्गात होतो.

**शिक्षकांचे सरासरी राजकिय मूल्य**

M = Σx / N

= २५९८ / ८०

= ३२.४८

सरासरी गुण = ३२.४८

३२.४८ म्हणजेच ३२ सरासरी गुण २९ - ३२ या गुणवर्गात येतात म्हणजेच माध्यमिक शिक्षकांचे राजकिय मूल्य फारच कमी आहे.

## धार्मिक मूल्य

### माध्यमिक शिक्षकांच्या धार्मिक मूल्याचे वर्गीकरण

माध्यमिक शिक्षकांच्या धार्मिक मूल्यासाठी २० प्रश्न निश्चित केले होते. या प्रश्नांना मिळालेल्या गुणानुसार खाली वर्गीकरण केले आहे.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३, | ३८, | ३१, | ३८, | २७, | ३६, | ४६, | ४२, | ३४, | ३२, | ३६, | ५२, |
| ४०, | ३२, | ३४, | ३७, | ३२, | ४४, | ४०, | २७, | ३८, | ३३, | ३८, | ४५, |
| ४५, | ३७, | ३७, | ४०, | ४२, | ४६, | ४०, | ३२, | २७, | ४४, | ३६, | ४८, |
| ४७, | ५२, | ४८, | ४९, | २४, | ३२, | १६, | ३६, | १४, | ४०, | ४२, | ३४, |
| ३७, | ३४, | ४५, | ४०, | ३७, | ३३, | ३६, | ३४, | ३१, | ३८, | ३८, | ४८, |
| ३७, | ३४, | २७, | ४५, | ३६, | ४०, | १६, | ३६, | ३४, | ४५, | ४९, | ३२, |
| ३६, | ४०, | ३२, | ३७, | ३७, | २७, | ४२, | ४०, | | | | |

वरील ८० गुणसख्याच्या आधारे गुणवर्गाचा आकार धरून खालील पत्रकात नोंदी व वारंवारिता दाखावल्या आहेत.

**शिक्षकांच्या धार्मिक मूल्यांचे कोष्टक क्र. ४ नुसार विश्लेषण**

**कोष्टक क्र. १०**

**धार्मिक मूल्याचे वारंवारिता पत्रक**

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | नॉर्मल | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १० च्या खाली | | ----- | ----- | 0 | 0 |
| ११ - १४ | \| | १ | १.२५% | १ | अतिशय निकृष्ट |
| १५ - १८ | \|\| | २ | २.५% | २ | निकृष्ट |
| १९ - ३० | 𝍸 \| | ६ | ७.५% | ३ | फारच कमी |
| ३१ - ३४ | 𝍸 𝍸 𝍸 \|\|\|\| | १९ | २३.७५% | ४ | कमी |
| ३५ - ४२ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३५ | ४३.७५% | ५ | सरासरी |
| ४३ - ४६ | 𝍸 \|\|\|\| | ९ | ११.२५% | ६ | बरा |
| ४७ - ५४ | 𝍸 \|\|\| | ८ | १० % | ७ | चांगला |
| ५५ - ६६ | | ----- | ----- | ८ | फार चांगला |
| ६७ - ७४ | | ----- | ----- | ९ | उत्कृष्ट |
| ७५ च्या वर | | ----- | ----- | १० | अतिशय चांगला |
| | **एकूण** | ८० | **१०० %** | | |

वरील कोष्टक क्र. १० मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या धार्मिक मूल्याला मिळालेल्या गुणांची वारंवारिता पत्रकावरून असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकांच्यापैकी१.२५ % शिक्षकांचे धार्मिक मूल्य अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. २.५% शिक्षकांचे धार्मिक मूल्य निकृष्ट आहे. ७.५% शिक्षकांचे धार्मिक मूल्य फारच कमी आहे. ४३.७५% शिक्षकांचे धार्मिक मूल्य सरासरी आहे.११.२५% शिक्षकांचे धार्मिक मूल्य बरे आहे.१०% शिक्षकांचे धार्मिक मूल्य चांगले आहे. म्हणजेच जास्तीत जास्त ४३.७५%

शिक्षकांचे मूल्य सरासरी आहे. तर कमीत कमी १.७५% शिक्षकांचे धार्मिक मूल्य निकृष्ट दर्जाचे आहे. म्हणजे सर्वात जास्त शिक्षकांचा समावेश ३५ - ४२ या गुणवर्गात होतो तर सर्वात कमी शिक्षकांचा ११ - १४ या गुणवर्गात समावेश होतो.

### शिक्षकांचे सरासरी धार्मिक मूल्य

M = Σx / N

= २९६५ / ८०

= ३२.४८

३२.४८ म्हणजे ३७ सरासरी गुण ३५ -४२ या गुणवर्गात येतात म्हणजेच माध्यमिक शिक्षकांचे धार्मिक मूल्य सरासरी आहे.

वरील कोष्टक क्र. ५ ते १० नुसार माध्यमिक शिक्षकांच्या सहा मूल्यांचे (सैध्दांतिक, सौंदर्यविषयक, आर्थिक, राजकिय, धार्मिक) सरासरी गुण खालील प्रमाणे आहेत.

**कोष्टक क्र.११**

**माध्यमिक शिक्षकांच्या ६ मूल्यांचे सरासरी गूण**


| अ.क्र. | मूल्य | सरासरी गुण | शेकडेवारी | नॉर्मल गुण / विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| १. | सैध्दांतिक | ५२.६१ | ६५.७६% | ८ फार चांगला |
| २. | आर्थिक | ३७.१३ | ४६.४१% | ५ सरासरी |
| ३. | सौदर्यविषयक | ४१.९१ | ५२.३८% | ६ बरा |
| ४. | सामाजिक | ३४.३३ | ४२.९१% | ५ सरासरी |
| ५. | राजकिय | ३२.४८ | ४०.०६% | ३ फार कमी |
| ६. | धार्मिक | ३७.६७ | ४६.३३% | ५ सरासरी |

मिळालेल्या माहितीच्या आधारे असे आढळून येते की शिक्षकांच्या सहा प्रकारच्या मूल्यांमध्ये काही मूल्ये जास्त प्रमाणात आहे तर काही मूल्य कमी आहे. त्यावरून या मूल्यांचा एक विशेष क्रम निश्चित होतो.

मिळालेल्या सरासरी गुणांच्या नॉर्मल स्कोर (सामान्य गुण) वरुन शिक्षकांच्या सरासरी मूल्यांचे आलेखाद्वारे सादरीकरण करता येते.

आलेख क्र. १

माध्यमिक शिक्षकांची मूल्ये दर्शविणारा आलेख




मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले असता, असे दिसून येते की, माध्यमिक शिक्षकांना सर्वात अधिक गुण सैध्दांतिक मूल्याला मिळालेले आहेत. तर सर्वात कमी गुण राजकीय मूल्यला मिळालेले आहेत. आपण जर मिळालेल्या गुणांच्या आधारे शिक्षकांच्या मूल्यांचा क्रम निश्चित केला तर तो अशा प्रकारचा होईल. सैध्दांतिक, सौंदर्यविषयक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय असा होईल. येथे सहा मूल्यांचे पाच गट होतात. यामध्ये सैध्दांतिक मूल्य प्रथम, सौंदर्यविषयक द्वितीय, आर्थिक आणि धार्मिक मूल्य तृतीय, सामाजिक मूल्य चौथे तर राजकीय मूल्य पाचवे असा क्रम आहे.

मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून आले की, शिक्षकांना सर्वात अधिक गुण सैध्दांतिक मूल्याला आहेत. म्हणजेच माध्यमिक शिक्षकांच्याकडे तत्वज्ञान विषयक मूल्य अधिक प्रमाणात आहेत. म्हणजेच प्रत्येक गोष्टीकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोण सकारात्मक आहे. प्रत्यक्ष व्यवहारात प्रत्येक गोष्टीकडे तात्विक दृष्टीकोणातून पाहतात. तर सर्वात कमी गुण राजकीय मूल्याला आहे. म्हणजेच राजकारणामध्ये माध्यमिक शिक्षकांना मोठया प्रमाणात रस नाही असे दिसून येते.

**कोष्टक क्र. १२**

## पुरुष शिक्षकांच्या सहा मूल्यांचे सरासरी गुण व नॉर्मल स्कोअर

| अ. क्र. | मूल्ये | एकूण गुण | सरासरी गुण | नॉर्मल स्कोअर |
|---|---|---|---|---|
| १. | सैध्दांतिक | ३३२५ | ५१.९५ | ८ |
| २. | आर्थिक | २३६१ | ३६.८९ | ५ |
| ३. | सौंदर्यविषयक | २६८७ | ४१.१८ | ५ |
| ४. | सामाजिक | २०२५ | ३१.६४ | ४ |
| ५. | राजकीय | २०६४ | ३२.२५ | ३ |
| ६. | धार्मिक | २५६९ | ४०.१४ | ५ |

कोष्टक क्र. १२ नुसार पुरूष शिक्षकांना सैध्दांतिक मूल्याला ५१.९५ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ८ आहे. आर्थिक मूल्याला सरासरी गुण ३६.८९ मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ५ आहे. सौंदर्य विषयक मूल्याला ४१.१८ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ५ आहे. सामाजिक मूल्याला ३१.६४ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ४ आहे. राजकिय मूल्याला ३२.२५ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ३ आहे. धार्मिक मुल्याला ४०,१४ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ५ आहे.

## कोष्टक क्र. १३

## स्त्री शिक्षकांच्या सहा मूल्यांचे सरासरी गुण व नॉर्मल स्कोअर

| अ. क्र. | मूल्ये | एकूण गुण | सरासरी गुण | नॉर्मल स्कोअर |
|---|---|---|---|---|
| १. | सैध्दांतिक | ८३० | ५१.८७ | ८ |
| २. | आर्थिक | ६११ | ३८.१६ | ५ |
| ३. | सौंदर्यविषयक | ६९९ | ४३.६८ | ६ |
| ४. | सामाजिक | ५०३ | ३१.४३ | ४ |
| ५. | राजकीय | ५४४ | ३४.०० | ४ |
| ६. | धार्मिक | ५९२ | ३७.०० | ६ |

कोष्टक क्र. १३ नुसार स्त्री शिक्षिकांना सैध्दांतिक मूल्याला ५१.८७ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ८ आहे. आर्थिक मूल्याला सरासरी गुण ३८.१६ मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ५ आहे. सौंदर्य विषयक मूल्याला ४३.६८ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ६ आहे. सामाजिक मूल्याला ३१.४३ सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ४ आहे. राजकिय मूल्याला ३४.०० सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ४ आहे. धार्मिक मुल्याला ३७.०० सरासरी गुण मिळाले आहेत आणि त्याचा नॉर्मल स्कोअर ६ आहे.

## माध्यमिक स्त्री शिक्षिकांच्या आणि पुरुष शिक्षकांच्या मूल्यांची तुलना

कोष्टक क्र १२ आणि १३ नुसार माध्यमिक स्त्री शिक्षिका आणि पुरूष शिक्षक यांना मिळालेले सरासरी गुण व त्यांचा नॉर्मल स्कोअर खालील कोष्टकाद्वारे दाखविता येईल.

## कोष्टक क्र. १४

## माध्यमिक स्त्री शिक्षकांच्या आणि पुरुष शिक्षकांच्या मूल्यांची तुलना


| अ. क्र. | मूल्ये | पुरुष शिक्षक | | स्त्री शिक्षक | |
|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी गुण | नॉर्मल गुण | सरासरी गुण | नॉर्मल गुण |
| १ | सैध्दांतिक | ५१.९५ | ८ | ५१.८७ | ८ |
| २ | आर्थिक | ३६.८९ | ५ | ३८.१६ | ५ |
| ३ | सौंदर्यविषयक | ४१.१८ | ५ | ४३.६८ | ६ |
| ४ | सामाजिक | ३१.६४ | ४ | ३१.४३ | ४ |
| ५ | राजकीय | ३२.२५ | ३ | ३४.०० | ४ |
| ६ | धार्मिक | ४०.१४ | ५ | ३७.०० | ६ |

कोष्टक क्र १४ वरून पाहिले असता माध्यमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या मुल्यांची तुलना केली असता पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये राजकिय, धार्मिक व सौंदर्यविषयक मूल्य जादा असल्याचे आढळून आले तर बाकीच्या तीन मूल्यांमध्ये समानता आढळून आली. यावरून स्त्रिया ह्या पुरूषांच्यापेक्षा जास्त प्रनाणात धार्मिक वृत्तीच्या असलेल्या आढळून आल्या. राजकिय मूल्य ही पुरूषांपेक्षा त्यांच्यामध्ये जादा आढळून आले तसेच त्यांच्या जवळ सौंदर्यविषयक मूल्य ही जादा आहेत म्हणजेच त्यांच्याकडे सौंदर्यात्मक दृष्टी असल्याचे आढळून येते.

स्त्री शिक्षकांच्या व पुरूष शिक्षकांच्या मूल्यांची तुलना आलेखाद्वारे दाखविता येईल.

आलेख क्र २

स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांच्या मूल्यांची तुलना दर्शविणारा आलेख



## माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचे विश्लेषण

माध्यमिक शिक्षकांनी भरुन दिलेल्या शिक्षक समायोजन शोधिकेवरुन समायोजन क्षमतेचे विश्लेषण केले आहे.

## माध्यमिक शिक्षकांची समायोजन क्षमता वर्गीकरण गुण विश्लेषण कोष्टक

**कोष्टक क्र. १५**

| अ.क्र. | समायोजन क्षमता क्षेत्र | श्रेणी | विश्लेषण | प्राप्त गुण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्रिया |
| १. | शालेय वातावरण व सर्व | अ | फार चांगला | १०५ च्या वर | ११३ च्या वर |
| | सामान्य वातावरण समायोजन | ब | चांगला | ८२ - १०४ | ९० - ११२ |
| | क्षमता प्र.क्र. १ ते ४४, | क | सरासरी | ५८ - ८१ | ६५ - ८९ |
| | २०३ ते २३३ | ड | कमी | ३६ - ५७ | ४२ - ६४ |
| | | इ | फार कमी | ३५ च्या खाली | ४१ च्या खाली |
| २. | सामाजिक,मानसिक,भौतिक, | अ | फार चांगला | १६५ च्या वर | १५५ च्या वर |
| | समायोजन क्षमता | ब | चांगला | १३६ - १६४ | १२७ - १५४ |
| | प्र.क्र. ४५ ते ९५ | क | सरासरी | १०६ - १३५ | ९८ - १२६ |
| | २२४ ते २५३ | ड | कमी | ७७ - १०५ | ७१ - ९६ |
| | | इ | फार कमी | ७१ च्या खाली | ७० च्या खाली |
| ३. | व्यवसायिक संबंध | अ | फार चांगला | १०२ च्या वर | ११२ च्या वर |
| | समायोजन क्षमता | ब | चांगला | ८४ -१०१ | ८७ - १११ |
| | प्र. क्र. ९६ ते १३४ | क | सरासरी | ६४ - ८३ | ७२ - ८६ |
| | २०३ ते २१२ | ड | कमी | ४७ - ६३ | ५७ - ७१ |
| | | इ | फार कमी | ४६ च्या खाली | ५६ च्या खाली |
| ४. | व्यक्तिगत जीवन | अ | फार चांगला | १४८ च्या वर | १४४ च्या वर |
| | समायोजन क्षमता | ब | चांगला | १२१ - १४७ | १२० - १४३ |
| | प्र. क्र. १३५ ते १६७ | क | सरासरी | ९४ -१२० | ९५ - ११९ |
| | २१३ ते २५३ | ड | कमी | ६८ - ९३ | ७२ - ९४ |
| | | इ | फार कमी | ६७ च्या खाली | ७१ च्या खाली |
| ५. | आर्थिक व व्यावसायिक | अ | फार चांगला | ७२ च्या वर | ७४ च्या वर |
| | समाधान समायोजन | ब | चांगला | ५५ - ७१ | ६१ - ७३ |
| | क्षमता. | क | सरासरी | ३८ - ५४ | ४७ - ६० |
| | प्र. क्र. १६८ ते १०२ | ड | कमी | २२ -३७ | ३४ - ४६ |
| | | इ | फार कमी | २१ च्या खाली | ३३ च्या खाली |

## माध्यमिक शिक्षकांच्या शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण क्षमतेचे कोष्टक क्र. १५ नुसार विश्लेषण

### शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमता वर्गीकरण

७६, ६४, ९४, ६०, ७४, ६०, ६४, ७४, ६६, ९२, ६४,

७८, ७०, ७०, ९०, ५८, ५२, ९४, ७०, ९२, ६४, ७४,

६८, ६४, ८४, ५८, ९२, ६४, ७६, ६५, ८१, ७२, ६४,

८३, ७४, ८०, ७४, ८०, ८४, ८०, ६४, ४७, ८४, ९२,

७४, ६१, ८४, ८८, ४८, ६८, ७६, ७४, ६०, ८३, ५८,

७६, ७०, ५८, ८२, ७६, ५८, ८३, ८१, ४२, ७२, ९३,

६८, ९०, ९४, ९२, ९९, ९०, ७०, ११०, ९८, ८३, ८४,

८०, ७४, ८३

समायोजन शोधिकेमध्ये शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण क्षमतेसाठी शोधिकेच्या एकूण आठ भागापैकी भाग १, भाग ६ व भाग ८ मध्ये अनुक्रमे ४४, ९ व १२ असे एकूण ६५ प्रश्न विचारले आहेत. वर दिलेल्या ८० गुणसंख्याच्या आधारे गुणवर्गाचा आकार धरुन खालील पत्रकात नोंदी वारंवारिता व त्याचे श्रेणीकरण दाखविले आहे.

## शिक्षकांच्या शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमतेचे सारणी क्र. १५ नुसार विश्लेषण

### कोष्टक क्र. १६

### शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण क्षमतेचे वारंवारिता पत्रक

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | श्रेणी | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १०५च्या वर | \| | १ | १.२५ | अ | अतिशय चांगला |
| ८२ - १०४ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \| | २६ | ३२.५ | ब | चांगला |
| ५८ - ८१ | 𝍸𝍸𝍸𝍸𝍸𝍸𝍸𝍸𝍸\|\|\|\| | ४९ | ६१.२५ | क | सरासरी |
| ३६ - ५७ | \|\|\|\| | ४ | ५ | ड | निकृष्ट |
| ३५च्या खाली | ——— | ० | ० | इ | अतिशय निकृष्ट |
| | एकूण | ८० | १०० | | |

वरील कोष्टक क्र.१६ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांच्या वारवांरिता पत्राकावरून असे अनूमान काढता येते की ८० शिक्षकांपैकी ३६ - ५७ या गुणवर्गामध्ये चार शिक्षकांचा समावेश आहे.तर ५८ - ८१ या गुणवर्गामध्ये ४९शिक्षकांचा समावेश आहे. तर ८२ -१०४ या गुणावर्गामध्ये २६ शिक्षकांचा समावेश आहे. तर १०५ च्या वर या गुणवर्गात एका शिक्षकाचा समावेश आहे.

शेकडेवारीचा विचार केला असता ६१.२५% शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता सरासरी या श्रेणीमध्ये येते तर सर्वात कमी म्हणजे ५% शिक्षकांची क्षमता निकृष्ट दर्जाची आढळते. यावरून या क्षेत्रामधील माध्यमिक शिक्षकांची समायोजन क्षमता सरासरी असल्याचे आढळुन येते.

शिक्षकांची शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण क्षेत्रातील सरासरी समायोजन क्षमता

M = Σx / N

= ६६८८ / ८०

= ८३.६

सरासरी गुण ८३.६

## सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमता

माध्यमिक शिक्षकांना दिलेल्या समायोजन शोधिकेमध्ये सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेसाठी भाग २ व भाग ८ मध्ये असलेल्या प्रश्नांना मिळालेल्या गुणावरुन खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

१३७, १४६, १४६, १२२, १४६, १२२, १२४, १३६, १२१,

१४४, १३४, १३३, १४८, १२८, १४६, १२४, ३८, १३१,

७२, १४६, १३६, १४३, १२१, १३४, १ २४, १२४, १५४,

१३६, १४०, ६८, १३४, १३२, ११०, १३४, १३६, १४६,

१४६, १४४, १२४, १४८, १३४, १२६, १४८, १३८, १४३,

१२१, १४०, १२१, ९६, ९८, १११, १४६, ११८, १४६,

१०६, १४३, १४८, १२४, १४२, १३७, १०६, १४२, १३७,

३८, १११, १३२, ११६, १२८, १५४, १२४, १६०, १४६,

१२८, १३०, १४१, १४६, १४४, १३६, १२४, १४८,

**माध्यमिक शिक्षकाच्या सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेचे कोष्टक क्र. १५ नुसार विश्लेषण**

**कोष्टक क्र. १७**

**सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेचे वारंवारिता पत्राक**

| वर्गांतर | गुणवर्गाच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | श्रेणी | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १६५च्या वर | ------------- | 0 | ------- | अ | अतिशय चांगला |
| १३६–१६४ | ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ \|\|\|\| | ४१ | ५२.२५ | ब | चांगला |
| १०६ – १३५ | ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ ࿋ \|\|\|\| | ३४ | ४२.५ | क | सरासरी |
| ७७ – १०५ | \|\|\|\| | ४ | ३.७५ | ड | निकृष्ट |
| ७१च्या खाली | \|\| | 2 | २.५ | इ | अतिशय निकृष्ट |

वरील कोष्टक क्र. १७ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरून असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी ७१ व त्यांच्या खाली २ शिक्षकांचा समावेश होतो तर ७७-१०५ या गुणवर्गामध्ये तीन शिक्षकांचा समावेश होतो. १०६ ते १३५ या गुणवर्गामध्ये ३४ शिक्षकांचा समावेश होतो तर १३६-१६४ या गुणवर्गामध्ये ४१ शिक्षकांचा समावेश होतो यावरून या क्षेत्रातील माध्यमिक शिक्षकांची समायोजन क्षमता चांगली असल्याचे आढळून येते.

**शिक्षकांची सामाजिक मानसिक भौतिक क्षेत्रातील समायोजन क्षमतेचे सरासरी गुण**

M = Σx / N

= १०२४० / ८०

= १२८

सरासरी = १२८

सरासरी गुणांवरून या क्षेत्रातील समायोजन क्षमता सरासरी या श्रेणीमध्ये येते.

## व्यावसायिक सबंध समायोजन क्षमता

माध्यमिक शिक्षकांना दिलेल्या समायोजन शोधिकेमध्ये व्यावसायिक सबंध समायोजन क्षमतेसाठी भाग ३ व भाग ६ मध्ये असेलेल्या प्रश्नांना मिळालेल्या गुणावरून खालील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक सबंध समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांचे वर्गीकरण.

८५, ८६, ८४, ६४, ८६, ६४, ६८, ८४, ७६, ८८,
८०, ८०, ८८, ६८, ८०, ६६, ३६, ८७, ८६, ७८,
८४, ८७, ७९, ८०, ७८, ६४, ८२, ८२, ८८, ४७,
८८, ८२, ७३, ९०, ८४, ८६, ८६, ८६, ७८, ८८,
८०, ७०, ९१, ८७, ८७, ८५, ९२, ८७, ८३, ७८,
८२, ८६, ६०, ८६, ६४, ७९, ८८, ६६, ९१, ८५,
६४, ८४, ८६, ३६, ६८, ८४, ८८, ७६, ८२, ८४,
८७, ८०, ६८, ८६, ६८, ८६, ८७, ९०, ७८, ८८,

**माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक संबंध समायोजन क्षमतेचे कोष्टक क्र. १५ नुसार विश्लेषण**

**कोष्टक क्र. १८**

**माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक सबंध समायोजन क्षमतेचे वारंवारिता पत्रक**

| वर्गांतर | वर्गातराच्या नोंदी | वारंवारिता | शेकडेवारी | श्रेणी | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १०२ च्यावर | | ० | ० | अ | अतिशय चांगला |
| ८४ - १०१ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \| | ४१ | ५१.२५ | ब | चांगला |
| ६४ -८३ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३५ | ४३.७५ | क | सरासरी |
| ४७ - ६३ | \|\| | २ | २.५ | ड | निकृष्ट |
| ४६ च्या खाली | \|\| | २ | २.५ | इ | अतिशय निकृष्ट |
| | **एकूण** | ८० | १०० % | | |

वरील कोष्टक क्र. १८ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसायिक सबंध समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरून असे अनुमान काढता येते की ८० शिक्षकापैकी ४२- व त्याखालील वर्गातरामध्ये २ शिक्षकांचा समावेश होतो तर ४७-६३ या वर्गातरामध्ये २ शिक्षकांचा समावेश होतो तर ६४-८३ या वर्गातरामध्ये ३५ शिक्षकांचा समावेश होतो तर ८४-१०१ या वर्गातरामध्ये सर्वात जास्त म्हणजेच ४१ शिक्षकांचा समावेश होतो. तर १०२-आणि त्या वर या वर्गातरामध्ये एकाही शिक्षकाचा

समावेश नाही. म्हणजेच शेकडा ५१.२५% शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता चांगली असल्याचे आढळते. तर शे.२.५% शिक्षकांची समायोजन क्षमता अतिशय निकृष्ठ दर्जाची आहे.

**माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक सबंध समायोजन क्षमतेचे सरासरी गुण**

M = Σx / N

= ६३४२ / ८०

= ७९.२८

सरासरी = ७९.२८

सरासरी गुणावरून माध्यमिक शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता 'सरासरी' या श्रेणीमध्ये येते.

## व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता

माध्यमिक शिक्षकांना दिलेल्या समायोजन शोधिकेमध्ये व्यक्तीगत जीवन समायोजन क्षमतेसाठी भाग ४ भाग ७ व भाग ८ मध्ये असलेल्या ७५ प्रश्नांना मिळालेल्या गुणावरून खालील प्रमाणे वर्गीकरण केलेले आहे.

११६, १२३, १६०, ९२, १२२, ९२, ९४, १२०, १३१, १३०, १२४, १२१,

६६, ९६, १४४, ९८, ३६, १३१, १२६, १३१, १२८, १२३, १२५, १२४,

१२१, ९२, १२२, १२४, ११८, ५४, १२४, ९८, १०८, १२४, १२०, १२२,

११२, १२२, ११२, १२४, १२४, १३१, १२०, ११२, १२३, १००, १११, १२१,

१४०, १३०, १३१, ११२, ९४, १२३, ८४, १२२, ६६, ९८, १२०, ११६,

८४, १२३, १२८, ३६, १००, १००, ११८, १२२, १२२, ११८, ११६, १४६,

९६, १३१, १४१, १२३, १२६, १२४, ११२, १२४,

माध्यमिक शिक्षकांच्या व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमतेचे कोष्टक क्र. १५ नुसार विश्लेषण

**कोष्टक क्र. १९.**

**व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमतेचे वारंवारिता पत्रक**

| वर्गांतर | वर्गांतराच्या नोंदी | वारंवरिता | शेकडेवारी | श्रेणी | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| १४८च्यावर \| | \| | १ | १.२५ | अ | अतिशय चांगला |
| १२१ - १४७ | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 \|\| | ४२ | ५२.५० | ब | चांगला |
| ९४ - १२० | 卌 卌 卌 卌 卌 \|\| | २७ | ३३.७५ | क | सरासरी |
| ६८ - ९३ | 卌 | ५ | ६.२५ | ड | निकृष्ट |
| ६७ च्याखाली | 卌 | ५ | ६.२५ | इ | अतिशय निकृष्ट |
| | **एकूण** | ८० | १०० % | | |

वरील कोष्टक क्र. १९ मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरुन असे अनुमान काढता येते की ४० शिक्षकापैकी ६७ च्या खाली या वर्गांतरामधये पाच शिक्षकांचा समावेश होतो. तर ६८–९३ या वर्गांतरामध्ये पाच शिक्षकांचा समावेश होतो.

तर ९४–१२० या गुणवर्गामध्ये २७ शिक्षकाचा समावेश होतो. तर १२१–१४७ या गुणवर्गामध्ये g drV O mñV ãhEnO M 47 ámj H$ma mg _ml{mhnV m{ Va 148 ab या वर्गांतरामध्ये सर्वात कमी म्हणजे १ शिक्षकाचा समावेश होतो. शेकडेवारीचा विचार केला तर शेकडा ५२.५ % शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन चांगली असल्याची आढळले. तर ६.२५ % शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता निकृष्ठ दर्जाची आढळली. तर ३३.७५ शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता सरासरी आढळली.

शिक्षकांचे व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता क्षेत्रातील सरासरी गुण

M = Σx / N

= ९१९३ / ८०

= ११३.९२ **सरासरी = ११३.९२**

सरासरी गुणावरुन माध्यमिक शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन 'सरासरी' या श्रेणीमध्ये येते.

## आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता

माध्यमिक शिक्षकांना दिलेल्या समायोजन शोधिकेमध्ये आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमतेसाठी भाग ५ मध्ये ३६ प्रश्नांना मिळालेल्या गुणांवरून खालील प्रमाणे वर्गीकरण केलेले आहे.

४६, ५८, ८७, ४०, ५४, ६८, ४८, ६८, ३८, ७८, ५१, ५६,

५६, ५४, ७८, ४०, ३२, ७८, ५४, ७५, ५१, ४८, ६८, ५१,

६८, ४०, ५२, ५०, ५४, २१, ४८, ४२, ३८, ४८, ४८, ५२,

५४, ५२, ६८, ५२, ५७, ४१, ६०, ६४, ४८, ४६, ६०, ६८,

८७, ७७, ६३, ५४, ४०, ५४, ४०, ५०, ५६, ४०, ६०, ४८,

४०, ५८, ४८, ३२, ३३, ४८, ५३, ४८, ५२, ४८, ८७, ७८,

५४, ६०, ५८, ५४, ६८, ४८, ६७, ६९

### माध्यमिक शिक्षकांच्या आर्थिक व व्यवसायिक समाधान समायोजन क्षमतेचे

### कोष्टक क्र. १५ नुसार विश्लेषण

### कोष्टक क्र. २०

माध्यमिक शिक्षकांच्या आर्थिक व व्यवसायिक समाधान समायोजन क्षमतेचे वारंवारिता पत्रक

| वर्गातर | वर्गातराच्या नोंदी | वारंवारता | शेकडेवारी | श्रेणी | विश्लेषण |
|---|---|---|---|---|---|
| ७२च्यावर | 卌 \|\|\|\| | ९ | ११.२५ | अ | अतिशय चांगला |
| ५५ – ७१ | 卌 卌 卌 卌 \|\|\| | २३ | २८.७५ | ब | चांगला |
| ३८ – ५४ | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 | ४५ | ५६.२५ | क | सरासरी |
| २२ – ३७ | \|\|\| | ३ | ३.७५ | ड | निकृष्ट |
| २१च्याखाली | | ० | ० | इ | अतिशय निकृष्ट |
| | एकूण | ८० | १०० % | | |

वरील कोष्टक क्र. २० मध्ये नोंद झालेल्या माध्यमिक शिक्षकांच्या आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमतेला मिळालेल्या गुणांच्या वारंवारिता पत्रकावरून असे अनुमान काढता येते की ८०

शिक्षकापैकी २२ – ३७ या वर्गातरामध्ये ३ शिक्षकांचा समावेश होतो तर ३८ – ५४ या वर्गातरामध्ये ४५ शिक्षकांचा समावेश होतो तर ५५ – ७१ या गुणवर्गामध्ये २३ शिक्षकांचा समावेश होतो. तर ७२ च्या वर यामध्ये ९ शिक्षकांचा समावेश होतो. यावरुन असे अनुमान काढता येईल की शेकडा ५६.२५ % शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता सरासरी आहे. तर २८.७५ % शिक्षकांची समायोजन क्षमता चांगली आहे. तर ११.२५ % शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता अतिशय चांगली आहेत. तर ३.७५ % शिक्षकांची समायोजन क्षमता निकृष्ठ दर्जाची आहे.

आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमतेचे सरासरी गुण

M = Σx / N

= ४३४९ / ८०

= ३४.३७ **सरासरी गुण = ३४.३७**

वरील कोष्टक क्र. १६ ते कोष्टक क्र. २० नुसार माध्यमिक शिक्षकांच्या पाच समायोजन क्षनतेच्या क्षेत्राचे ( शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण क्षमता, सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमता, व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता, व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता, आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता) सरासरी गुण खालील प्रमाणे आहेत.

**कोष्टक क्र. २१**


**माध्यमिक शिक्षकांच्या पाच समायोजन क्षमतांचे सरासरी गुण**

| अ. क्र. | समायोजन क्षमता | सरासरी गुण | विश्लेषण |
|---|---|---|---|
| १. | शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमता | ७५.४७ | **ब** चांगली |
| २. | सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमता | १२८ | **क** सरासरी |
| ३. | व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता | ७९.२८ | **क** सरासरी |
| ४. | व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता | ११३.९२ | **क** सरासरी |
| ५. | आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता | ५४.३७ | **ब** चांगली |

मिळविलेल्या माहितीच्या आधारे असे आढळून येते की, शिक्षकांच्या समायोजन क्षेत्रामध्ये पाच समायोजन क्षमतांचा शोध घेत असताना त्यांना मिळालेल्या सरासरी गुणावरुन माध्यमिक शिक्षकांची शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण, आर्थिक व व्यावसायिक समाधान या क्षेत्रातील समायोजन क्षमता चांगली आहे. तर सामाजिक, मानसिक, भौतिक, समायोजन, व्यक्तिगत जीवन समायोजन व व्यावसायिक संबंध समायोजन या क्षेत्रातील समायोजन क्षमता सरासरी आहे. यावरुन शिक्षक आपल्या शिक्षकी व्यवसायामध्ये समाधानी आहेत.

**आलेख क्र. ३**

**माध्यमिक शिक्षकांना समायोजन क्षमतेमध्ये मिळालेले सरासरी गुण दर्शविणारा आलेख**



### कोष्टक क्र. २२

### माध्यमिक पुरुष शिक्षकांना समायोजन क्षमतेमध्ये मिळालेले सरासरी गुण व श्रेणीकरण

| अ. क्र. | समायोजन क्षमता | एकूण गुण | सरासरी गुण | विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| १. | शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमता | ४७८३ | ७४.७३ | **क** सरासरी |
| २. | सामाजिक,मानसिक,भौतिक,समायोजन क्षमता | ८२४७ | १२८.८५ | **क** सरासरी |
| ३. | व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता | ४९२४ | ७६.९३ | **क** सरासरी |
| ४. | व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता | ७०३३ | १०९.८९ | **क** सरासरी |
| ५. | आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता | ३२८५ | ५१.३२ | **क** सरासरी |

पुरूष शिक्षकांना शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमतेमध्ये सरासरी गुण ७४.७३ आहेत. सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेमध्ये सरासरी गुण १२८.८५ आहेत. व्यावसायिक संबध समायोजन क्षमतेमध्ये ७६.९३ आहेत. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमतेमध्ये १०९.८९ व आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमतेमध्ये ५१.३२ आहेत.

### कोष्टक क्र २३

### माध्यमिक स्त्री शिक्षिकांना समायोजन क्षमतेमध्ये मिळालेले सरासरी गुण व श्रेणीकरण

| अ. क्र. | समायोजन क्षमता | एकूण गुण | सरासरी गुण | विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| १. | शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमता | १३९३ | ८७.०६ | **क** सरासरी |
| २. | सामाजिक,मानसिक,भौतिक,समायोजन क्षमता | २२५६ | १४१.०० | **ब** सरासरी |
| ३. | व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता | १२४७ | ७७.९३ | **क** सरासरी |
| ४. | व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता | २०८१ | १३०.०६ | **ब** सरासरी |
| ५. | आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता | १११७ | ६९.८१ | **ब** सरासरी |

स्त्री शिक्षकांना शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमतेमध्ये सरासरी गुण ८७.६ आहेत. सामाजिक, मानसिक, भौतिक समायोजन क्षमतेमध्ये सरासरी गुण १४१.०० आहेत. व्यावसायिक संबध समायोजन क्षमतेमध्ये ७७.९३ आहेत. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमतेमध्ये १३०.६० व आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमतेमध्ये ६९.८१ आहेत.

कोष्टक क्र २४


## माध्यमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षिकांच्या समायोजन क्षमतेची तुलना

| अ. क्र. | समायोजन क्षमता | पुरूष शिक्षक | | स्त्री शिक्षक | |
|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी गुण | श्रेणी | सरासरी गुण | श्रेणी |
| १ | शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमता | ७४.७३ | क | ८७.६ | क |
| २ | सामाजिक,मानसिक,भौतिक,समायोजन क्षमता | १२८.८५ | क | १४१.०० | ब |
| ३ | व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता | ७६.९३ | क | ७७.९३ | क |
| ४ | व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता | १०९.८९ | क | १३०.६ | ब |
| ५ | आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता | ५१.३२ | क | ६९.८१ | ब |

कोष्टक क्र. २२ व कोष्टक क्र २३ वरून पाहिले असता माध्यमिक स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजन क्षमतेची तुलना केली असता पुरूषांपेक्षा स्त्री शिक्षकांची सामाजिक, मानसिक, भौतिक क्षेत्रातील, व्यक्तिगत जीवनातील, आर्थिक व व्यावसायिक समाधाना क्षेत्रातील क्षमता चांगली आहे. तर शालेय वातावरण व सर्वसामान्य वातावरण समायोजन व व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता पुरूष शिक्षकांसारखीच आहे म्हणजेच सरासरी आहे.

## आलेख क्र. ४

## माध्यमिक स्त्री व पुरुष शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचा तुलना दर्शविणारा आलेख



## समारोप

या प्रकरणामध्ये माध्यमिक शिक्षकांना दिलेल्या मूल्य अध्ययन चाचणी व शिक्षक समायोजन शोधिका यांना मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण व विश्लेषण करुन अन्वयार्थ लावण्यात आलेले आहे. हा अन्वयार्थ लावण्यात आलेले आहे. हा अन्वयार्थ माध्यमिक शिक्षकांच्यामध्ये असणारी मूल्ये व त्यांची विविध क्षेत्रामध्ये असणारी समायोजन क्षमता या संदर्भात लावलेला आहे. पुढील प्रकरण क्र. ६ मध्ये या प्रकरणामध्ये लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.